व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे सेट परीक्षेमध्ये यश

श्री व्यंकटेश महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अदिती ढोकरे हिने राज्य पात्रता परीक्षा म्हणजेच सेट परीक्षेमध्ये यश संपादन केले. याबद्दल महाविद्यालयांमध्ये पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार करण्यात आला सत्कार प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीने आणखीन एका नव्या क्षेत्रामध्ये यश संपादन केले याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी समाधान व्यक्त केले व सदर विद्यार्थिनीचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सातत्यपूर्ण अभ्यास व सखोल अभ्यास याशिवाय सेट ही परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य नाही या विद्यार्थिनीने हे सिद्ध करून दाखवले. व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये बी. कॉम. आणि एम. कॉम. पूर्ण केल्यानंतर सहाय्यक प्राध्यापक पात्रतेसाठी आवश्यक असणारी सेट परीक्षेसाठी तिने प्रयत्न सुरू केले व पहिल्याच प्रयत्नामध्ये तिने हे यश संपादन केले त्यामुळे सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असणारी पात्रता तिने पूर्ण केलेली आहे. सदर परीक्षेची तयारी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

